# सावदा नगरपरिषद, सावदा
# आरोग्य विभाग

मुख्याधिकारी,
सावदा नगरपरिषद,सावदा
यांचे कार्यालय

**सावदा नगरपरिषद, सावदा जि.जळगांव**
**आरोग्य विभाग**
**निविदा**
**सन-२०२६-२७**
**( तिसरी वेळ )**

**कामाचे नाव :- “सावदा शहरातील भटक्या कुत्र्यांना पकडणे, वाहतूक,नसबंदी, लसीकरण करणे व औषधोपचार करुन कुत्र्यांना सोडून देणे इ.अनुषंगिक कामे करण्यासाठी अँनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडीया (AWBI) च्या मान्यता प्राप्त संस्थेची निवड करणेबाबत”.**

| अ.क्र | कामाचे विवरण | अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | निविदा शुल्क | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १) | “सावदा शहरातील भटक्या कुत्र्यांना पकडणे, वाहतूक, नसबंदी, लसीकरण करणे व औषधोपचार करुन कुत्र्यांना सोडून देणे इ.अनुषंगिक कामे करण्यासाठी अँनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडीया (AWBI) च्या मान्यता प्राप्त संस्थेची निवड करणेबाबत”. | --- | ५०००/- | १०००/- | कार्यादेश मिळाल्यापासून पुढील ३ वर्षाकरीता |

**निविदा वेळापत्रक**

| | |
|---|---|
| निविदा प्रसिध्द दिनांक | दि. १५/०५/२०२६ सकाळी १०:०० पासून |
| निविदा दाखल करणेचा दिनांक | दि. १५/०५/२०२६ सकाळी १०:०० वा. पासून |
| निविदा दाखल करणेचा अंतिम दिनांक | दि. २२/०५/२०२६ सायं.०५:०० वा. पावेतो |
| तांत्रिक बोलीचा लिफाफा उघडणेचा दिनांक | दि. २६/०५/२०२६ सायं. ०५:०० वा. (शक्य झाल्यास) |
| वित्तीय बोलीचा लिफाफा उघडणेचा दिनांक | दि.२९/०५/२०२६ सकाळी १०:०० वा. (शक्य झाल्यास) |

**-: प्रस्तावना :-**

केंद्र शासनाने तयार केलेल्या प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३ व मा. सर्वोच्च न्यायालयाने SUO MOTO WRIT PETITION (Civil) No (s). 5 of 2025 या प्रकरणामध्ये भटक्या कुत्र्यांमुळे लहान मुलांवर झालेल्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर दि.११.०८.२०२५, दि.२२.०८.२०२५ व दि.०७.११.२०२५ रोजी प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३ मधील अनुषंगिक बाबींचे तातडीने अनुपालन करण्याचे निर्देश दिले आहेत.

त्याअनुषंगाने सावदा नगरपरिषद मध्ये प्राणी जन्म नियंत्रण नियम, २०२३ तसेच मा. सर्वोच्च न्यायालय आदेशाचे पूर्णतः अवलोकन करून त्याचे पालन व त्यासाठी नियमोचीत कार्यवाही तातडीने पूर्ण करणेबाबत वरिष्ठ कार्यालयामार्फत निर्देश देण्यात आले आहे.

त्याअर्थी सावदा नगरपरिषद आरोग्य विभागाकामार्फत “सावदा शहरातील भटकी व मोकाट कुत्रे पकडून लसीकरण करणे, नसबंदी करणे व इतर अनुषंगिक बाबीकरिता अँनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडीया (AWBI) मान्यता प्राप्त संस्थेची निवड करणेकामी शासनाच्या https://mahatenders.gov.in या प्रणालीवर ऑनलाईन पद्धतीने निविदा मागवीत आहे.

मुख्याधिकारी
सावदा नगरपरिषद
जि.जळगांव

## सावदा नगरपरिषद,सावदा
## आरोग्य विभाग

**कामाचे नाव :- "सावदा शहरातील भटकी व मोकाट कुत्रे पकडून लसीकरण करणे, नसबंदी करणे व इतर अनुषंगिक बाबीकरिता अँनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडीया (AWBI) मान्यता प्राप्त संस्थेची निवड करणेबाबत".**

**सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१. शासनमान्य नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

२. पात्र निविदाधारकास अधिनियमाच्या तरतुदीनुसार आवश्यक त्या रक्कमेच्या मुद्रांकावर अटी व शर्ती मान्य असलेबाबत करारनामा करुन देणे बंधनकारक राहील.

३. निविदेतील अटी व शर्ती निविदा धारकास बंधनकारक राहतील.

४. नगरपरिषदेने निविदा मंजुर केल्यानंतर निविदाधारकाने काम करण्यास नकार दिल्यास किंवा नगरपरिषदेस दुसऱ्या ठेकेदाराकडून काम करून घेणे भाग पडेल व नगरपरिषद कामास नकार देणाऱ्या ठेकेदाराकडून वसूल करेल तसेच त्याचे नाव काळ्या यादीत नोंदवून प्रसिध्द करेल. अथवा नगरपरिषद सदर प्रकरणी नगर परिषदेच्या सूचनेनुसार जो एकरकमी दंड निश्चित करेल तो दिलेल्या मुदतीत कार्यालयात जमा करावा लागेल.

५. नगरपरिषदेच्या हद्दीतील सर्व सार्वजनिक जागा, रस्ते, मोकळ्या जागा, नगरपरिषदेच्या मालमत्ता त्याचप्रमाणे खाजगी मालमत्ता धारकांनी पूर्व परवानगी दिली तर अशा ठिकाणी आढळणारी मोकाट श्वान पकडून त्यांचे निर्बीजीकरण करणेचे आहे.

६. श्वान पकडतानाचे geo tag फोटो देणे बंधनकारक राहील.

७. सदर कामाचा अहवाल दर आठवड्यास देणे बंधनकारक राहील.

८. श्वान पकडण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना साहित्य, मनुष्यबळ हे सर्व निविदाधारकाने वापरायचे आहे. परंतु श्वान पकडताना त्यांना कोणतीही गंभीर इजा दुखापत झाल्यास त्यास निविदाधारक जबाबदार राहील व त्याची काळजी निविदाधारकाने घ्यावयाची आहे. त्याचप्रमाणे प्राणी अत्याचार प्रतिबंधक अधिनियमाचे उल्लंघन होणार नाही याचीही जबाबदारी संबंधित निविदाधारकाने घ्यावयाची आहे. तसे काही झाल्यास याबाबत नगरपरिषद योग्य ती कार्यवाही करेल व नगरपरिषदेचा निर्णय अंतिम राहील.

९. श्वान पकडल्यानंतर त्यांचेवर शस्त्रक्रिया झाल्यावर त्याच दिवशी नगरपरिषदेच्या कार्यालयात लेखी स्वरुपात माहिती सादर करण्याची आहे. तसेच शस्त्रक्रिया केलेल्या श्वानाचे फोटो अहवालासोबत जोडणेचे आहेत व फोटोमध्ये श्वानाची ओळख पटली पाहीजे.

१०. निवारा केंद्रामध्ये वीज व पाणी याची व्यवस्था नगरपरिषदेकडून करण्यात येईल. मात्र या परिसरांची स्वच्छता ठेवणेची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

११. स्वच्छता ठेवणेची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

१२. संबंधित श्वानांना आवश्यक ते खाद्य देण्याची व्यवस्था निविदाधारकाने त्याचे स्वःखर्चाने करावयाची आहे.

१३. तसेच श्वान ताब्यात असेपर्यत श्वान तंदुरुस्त राहतील यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना निविदाधारकाने करण्याची आहे. श्वानांना काही झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदाधारकाची राहील.

१४. जर या कालावधीमध्ये एखादे श्वान आजारी झाल्याचे निदर्शनात आल्यास तात्काळ नगरपरिषदेस पूर्व संपर्क साधुन पशुवैद्यकीय अधिका-यांकडुन त्याची तपासणी करुन आवश्यक औषधोपचार करण्याचा आहे. तसेच पूर्ण सुधारणा होईपर्यंत काळजी घेण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

१५. कोणत्याही अटी शर्तीमध्ये बदल करणे किवा तत्कालीन परिस्थीतीनुरुप नवीन अटीचा समावेश करण्याचे अधिकार नगरपरिषदेस राहतील.

१६. सदरील कामाबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास तो सावदा नगरपरिषद ज्या न्यायीक कक्षेत येते त्या क्षेत्रात तो चालेल.

१७. निविदेबाबत काही प्रश्न उपस्थित झाल्यास नगरपरिषदेचा निर्णय अंतिम राहील.

१८. सदर निविदे बाबतची शुद्धीपत्रके https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल.

१९. कामाचा कालावधी कमी व अधिक करण्याचा अधिकार नगर परिषदेस राहील.

२०. प्रचलित कायद्यानुसार सर्व शासकीय कर तसेच सुरक्षा अनात रक्कम व दंड ( लागु असल्यास) ठेकेदाराच्या देयकातुन वजा करणेत येईल.

२१. नगरपरिषदेतील सन्माननीय पदाधिकारी व सदस्य यांच्या तक्रारींना प्राधान्य देवून त्यांचे निवारण करुन तक्रार निवारण झाले बाबतची नोंद संबधीतांना कळवावी लागेल.

२२. कोणतेही कारण न देता ठेका मध्येच बंद करणेचा अधिकार नगरपंचायतीने राखुन ठेवला आहे.

२३. अटी-शर्ती मधील एखाद्या अटी व शर्ती बाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही अटी व शर्ती जादा घालणेबाबत तसेच सर्व किंवा कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारण्याचा अधिकार नगरपंचायतीने राखून ठेवला आहे. सदरील कामातील कोणतीही बाब व काम समाधानकारक नसल्यास एकुण देयकाच्या 1 टक्के कपात करणेत येईल हे ठेकेदारास बंधनकारक राहील.

२४. सदर काम कार्यादेश दिल्यापासुन १ वर्षापर्यंत असेल. तसेच कामाच्या दर्जानुसार कामाचा कालावधी कमी अथवा जास्त करणेचा अधिकार नगरपंयातीने राखुन ठेवला आहे.

२५. मंजुर दराव्यतिरीक्त कोणतीही रक्कम अदा केली जाणार नाही. कोणत्याही परिस्थितीत भाववाढ लागू असणार नाही.

२६. ठेकेदाराच्या ठेक्याचा कालावधी संपलेनंतर सदरचा करार संपुष्टात येईल, भविष्यात या कामासाठी कोणताही हक्क ठेकेदारास सांगता येणार नाही.

२७. कोणतेही कारण न देता तसेच काम असमाधानकारक असल्यास व कंत्राटदाराने कार्यालयाशी समन्वय न ठेवल्यास ठेका मध्येच बंद/रद्द करणेचा अधिकार नगरपंचायतीस राहील.

२८. कंत्राटदाराने कामाचा आढावा घेणे, तसेच न.पं.सांगेल त्या वेळेस कार्यालयास भेट देणे , संपर्क व समन्वय ठेवणे आवश्यक आहे.

२९. सावदा नगरपरिषद सावदा तसेच नागरिकांच्या हितास बाधा अथवा हानी होईल असे कोणतेही कृत्य झाल्यास ,कामात हलगर्जीपणा झाल्यास निविदा रद्द करण्यात येईल व सर्व अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

३०. लेखापरिक्षणात / तपासणीत काही वसुलार्थ रक्कम निघाल्यास सदर रक्कम ठेकेदारास कळविल्यापासुन ८ दिवसांमध्ये भरावी लागेल. सदरहू वसुली रक्कम वसुल करण्यास निविदाधारकाची विना अट संमती असणार आहे.

३१. निविदाधारकाने निविदे संदर्भात सर्व दस्ताऐवज ऑफलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

**३२. वर नमुद माहितीसह दरपत्रक दिनांक २५ /०५/२६ पर्यंत किंवा अगोदर पूढील पत्त्यावर पाठवावे.**
**सावदा नगरपरिषद कार्यालय,सावदा ता. सावदा , जि.जळगांव, पिन -४२५३०६**

३३. सदर अटी व शर्ती व्यतिरीक्त इतर कोणत्याही बाबी करीता मा.मुख्याधिकारी ,यांचा निर्णय अंतिम राहील व तो ठेकेदारास बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.

३४. परिपुर्ण निविदा सादर करण्याची अंतिम दिनांक २२/ ०५ / २०२६ रोजी दु. ३:०० वाजेपर्यंत https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन करावयाचे आहेत.

**मुख्याधिकारी**
**सावदा नगरपरिषद सावदा**
**जि.जळगांव**

नगरपरिषद सावदा MUNICIPAL COUNCIL सावदा Savda Dist. Jalgaon जि. जळगांव

**लिफाफा क्रमांक - १. तांत्रिक बोली मधील आवश्यक कागदपत्रे.**

१) संस्था नोंदणी संबंधिचे कागदपत्रे (संस्था,संघटना / NGO ) इ.
२) संस्था भारतीय जीव जंतू कल्याण मंडळ (AWBI ) यांचे मान्यता प्राप्त असावी.
३) सदरील कामाबाबत अनुभवाचा दाखला ( संस्थेने आज रोजीपर्यंत श्वान निर्बीजीकरण / लसीकरण केलेली संख्या व अनुभव या आधारे मुल्यमापन करण्यात येईल.
४) INCOME TAX REGISTRATION CERTIFICATE
५) GST व PAN CARD नोंदणी प्रमाणपत्र
६) प्राणी जन्म नियंत्रण नियम २०२३ नुसार काम पुर्ण करणेचे असुन आवश्यक साधनसामुग्री संस्थेकडे / व्यक्तीकडे उपलब्ध असलेबाबतचे कागदपत्र सादर करावेत.
७) निविदा धारकाकडे स्वत:चे श्वान पकडणे करिता वाहन असावे अथवा वाहन पुरवठादाराबरोबर झालेला करार, सदर वाहनांचे आर.सी.बुकची छायांकीत प्रत सादर करणे आवश्यक आहे.
८) परिशिष्ट, I,II,III,IV बाँड शंभर रु.स्टॅम्प पेपरवर सादर करण्यात यावे.
९) कंपनी / वितरक काळ्या यादीत नसल्याबाबत रुपये शंभर रु.स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र
१०) निविदा फॉर्म फी व बयाना रक्कम भरणा केल्याची पावती.

**लिफाफा क्रमांक-२ आर्थिक बोली मधील कागदपत्रे –**

१) साहीत्याचे दर बाजार भावानुसार सादर करणे आवश्यक आहे.
२) दरपत्रकांचे दर, जीएसटी, वाहतूक खर्च ,खानपान,लसीकरण,औषधोपचार इत्यादींसह सादर करावे.

**निविदा सादर करतांना निविदाकाराने विचारात घेणेच्या बाबी:-**

१) लिफाफा क्रमांक १ मधील आवश्यक कागदपत्रांची पूर्तता होत नसल्यास लिफाफा क्रमांक २ उघडण्यात येणार नाही. तसेच याबाबत निविदा समितीचा निर्णय अंतिम असेल.
२) निविदाधारकाने निविदा सादर करतांना सावदा नगरपंचायतीने विहित केलेल्या अटी व शर्ती यांच्या तरतुदी विचारात घेऊन निविदा सादर करावयाची आहे. त्यातील अटी व शर्तीचे पालन करणे हे निविदाधारकास बंधनकारक आहे. अटी व शर्तीचे पालन न केल्यास निविदाधारकाची ई-निविदा रद्द करण्यात येईल.
३) अपुर्ण किंवा अर्धवट अस्पष्ट योग्य व्यक्तीने स्वाक्षरीत न केलेले कागदपत्रे फेटाळण्यात येतील.
४) निविदेसोबत सादर केलेली सर्व कागदपत्रे पुर्ण भरलेली व निविदाकाराने योग्यत साक्षांकीत केलेली असणे आवश्यक आहे. तसेच खाडाखोड व दुरुस्ती असलेल्या ठिकाणी निविदाकाराने लघु स्वाक्षरी करुन साक्षांकीत करावे.
५) निविदाकाराने निविदेत किंवा निविदेसोबत सादर केलेली कोणतीही माहीती ही अपुरी चुकीची, अस्पष्ट असल्याचे निष्पन्न झाल्यास निविदाधारकाची निविदा रद्द करण्याची व त्यास अपात्र ठरविणे कराराच्या कालावधीती करार रद्द करणेचा अधिकार मा.मुख्याधिकारी,सावदा नगरपरिषद यांना असेल
६) निविदाकाराने निविदेच्या प्रत्येक पानावर सर्वसाधारण अटी व शर्ती मान्य असल्यास सही न केल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही.
७) "सावदा शहरातील भटक्या कुत्र्यांना पकडणे, वाहतूक, नसबंदी, लसीकरण करणे व औषधोपचार करुन कुत्र्यांना सोडून देणे इ.अनुषंगिक कामे करण्यासाठी अँनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडीया (AWBI) च्या मान्यता प्राप्त संस्थेची निवड करणेकामी कमीत कमी ३ निविदा प्राप्त न झाल्यास निविदासाठीची मुदत वाढविणे बाबत किंवा फेर निविदा बोलाविणेबाबत अगर आलेले निविदापैकीच निविदा मंजूर करणेबाबचा मा.मुख्याधिकारी यांचा निर्णय अंतिम राहील.
८) निविदेसोबत बयाणा रक्कम न भरल्यास किंवा सादर केलेल्या कोणत्याही कागदपत्रांमध्ये खरेपणा न आढळल्यास , निविदा सादर केल्यास, नगरपंचायतीने नमूद केलेली पात्रता पूर्ण करु न शकल्यास अशा परिस्थितीत निविदा फेटाळण्यात येईल.
९) निविदाधारकास निविदा मंजूर झाल्यानंतर शासनाच्या नियमाप्रमाणे स्टॅम्प पेपरवर करारनामा करणे बंधनकारक राहील.
१०) सदर निविदाधारकास त्याने केलेल्या कामाचे देयक वेळेवर उपलब्ध न झाल्यास न.पं.निधी मध्ये उपलब्ध झाल्यानंतरच अदा केले जाईल.
११) अटी व शर्तीमध्ये बदल करण्याचे अधिकार मा.मुख्याधिकारी यांचे राहील.

नगरपरिषद सावदा MUNICIPAL COUNCIL DIST. JALGAON जळगांव

१२) कोणतेही कारण नमूद करुन अथवा असे कारण न देता आलेल्या निविदा स्वीकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार मुख्याधिकारी यांचेकडे राखून ठेवला आहे.

१३) कोणत्याही वेळी कोणतेही कारण न देता निविदा रद्द करण्याचा आणि ठेका रद्द करण्याचा अधिकार मा.मुख्याधिकारी यांना राहील.

**निविदा स्विकारणे अथवा नाकारणे :-**

१) ऑनलाईन निविदा पद्धतीनुसार मागविण्यात आलेल्या निविदामधून सर्व प्रथम तांत्रिक कागदपत्राचा लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल.

२) जे निविदाकार तांत्रिक बोलीनुसार निविदेत नमूद पात्रता धारण करीत असतील अशाच निविदाकारांच्या वित्तीय बोलीच्या आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल.

३) सादर केलेल्या कोणत्याही कागदपत्रामध्ये खरेपणा न आढळल्यास, निविदा सादर करतांना भ्रष्ट व कपट मार्गाचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास , सशर्त निविदा सादर केल्यसा नगरपंचायतीने नमूद केलेली पात्रता पूर्ण करु न शकल्यास अशा परिस्थितीत निविदा फेटाळण्यात येतील.

४) सर्वसाधारणपणे कमीत कमी दराची परंतु वाजवी दराची निविदा नगरपरिषदेच्या मान्यतेनंतर निविदा मंजुर करण्याचे अधिकार नगरपंचायतीस राहील.

५) निविदाकाराच्या पात्रतेबाबत नगरपंचायतीचा निर्णय हा अंतिम असेल व त्याबाबत निविदाकारास कोणताही वाद घालता येणार नाही.

६) कोणतीही निविदा जरी उच्च देयकाची असेल तरी किंवा इतर कोणतीही निविदा मान्य करणेचा , त्यात बदल करणेचा , तिचे विभाजन करणेचा, वाटाघाटी करणेचा किंवा कोणतेही कारण न देता कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अधिकार मा.मुख्याधिकारी,सावदा नगरपरिषद यांचेकडे असेल त्याबाबत कोणासही वाद उपस्थित करता येणार नाही.

**सुरक्षा अनामत :-**

१) ज्या निविदाधारकांची निविदा स्विकृती करण्यात येईल त्यास प्रत्येक बिलातून १० % रक्कम सुरक्षा अनामत म्हणून कपात करण्यात येईल.

२) निविदाकाराने सुरक्षा अनामत नगरपरिषद कोषागारात सलग जमा ठेवणे बंधनकारक राहील

३) सुरक्षा अनामत रक्कमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज देय असणार नाही.

**करारनामा :-**

१) ज्या निविदाकाराची निविदा मंजूर करण्यात येईल त्याने त्यास नगरपंचायतीने सुचित केल्यानंतर लगेज योग्य किंमतीच्या मुद्रांकावर व कराराचे परिपुर्ण पालन करणेबाबत लेखी करारनामा मुख्याधिकारी यांचे समक्ष करुन द्यावा लागेल.

**संकीर्ण :-**

या करारासंबंधी कोणताही दावा कोणत्याही न्यायालयात झाल्यास दाव्याच्या दोन्ही बाजूचा खर्च म्हणजेच नगरपंचायतीचा खर्च धरुन अभिकर्त्यास करावा लागेल. वरील अटी व शर्तीतील एखाद्या बाबीच्या अर्था संबंधात वाद असल्यास त्याबाबत मा.मुख्याधिकारी नगरपरिषद जो निर्णय देतील तो सर्व पक्षावर बंधनकारक असेल.

नगरपरिषद सावदा MUNICIPAL COUNCIL सावदा Savda Dist. Jalgaon जि. जळगांव

मुख्याधिकारी
**सावदा नगरपरिषद सावदा**
**जि.जळगांव**



Signature Not Verified
Digitally signed by Bhushan Vijay Varma
Date: 2026.05.13 17:38:28 GMT 09:30
Location: Maharashtra-MH